डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४४ /२०२६ दि. २३/०२/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतर्गत डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत कोपर रोड, कोपर ब्रिज उतरणीवरील उजवे वळण घेवुन वाहने पं. दिनदयाळ चौकाच्या दिशेने व कोपर ब्रिज चढणीवरील उजवे वळण घेवुन डोंबिवली पुर्व येथे जाणारी वाहने तसेच कोपर गावच्या दिशेने जाणारी वाहने कोपर ब्रिज, डोंबिवली पश्चिम येथे समोरासमोर येत असतात. सदर ठिकाणी वळणावर रस्ता अरूंद असल्याने समोरासमोर आलेल्या वाहनांमुळे वाहतुक कोंडी होवुन अपघात होत असतात. संभाव्य वाहतुक कोंडी टाळण्यासाठी व अपघात टाळण्यासाठी कोपर रोड, कोपर ब्रिज उतरणीवरील उजवे वळण घेवुन डोंबिवली पश्चिम येथे व कोपर ब्रिज चढणीवरील उजवे वळण घेवुन डोंबिवली पुर्व येथे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करणे व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातुन आवश्यक असल्याचे याबाबत केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत आढळुन आले आहे. तसेच प्रसंगी आपत्कालीन परिस्थितीत वाहतुक कोंडी सोडविणे व अपघातग्रस्तांना मदत पुरविणे अशा आपत्कालीन परिस्थितीत मोठ्या समस्या व अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** कोपर ब्रिजवरून उतरणीवर उजवे वळण घेवुन दिनदयाळ रोड डोंबिवली पश्चिम कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोपर ब्रिज उतरणीवर, डोंबिवली पश्चिम** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने डावे वळण घेवुन कोपर रोडकडील कै. श्रीमती मिनाताई ठाकरे उदयान येथुन उजवे वळण घेवुन पुढे तेजस बिल्डिंग येथे उजवे वळण घेवुन एन.एम.एम.टी. बस स्टॉप येथे उजवे वळण घेवुन कोपर रोड येथे डावे वळण घेवुन पुढे डोंबिवली पश्चिम येथुन इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** कोपर रोडकडुन कोपर ब्रिज चढणीवरील उजवे वळण घेवुन डोंबिवली पुर्व येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोपर ब्रिज उतरणीवर, डोंबिवली पश्चिम** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने कोपर रोडने सरळ पुढे जावुन जुनी डोंबिवली क्रॉस रोड, सेंट्रल हॉटेल शेजारी येथे यु टर्न घेवुन डोंबिवली पुर्व येथुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** तेजस बिल्डिंग, जुनी डोंबिवली येथुन कै. श्रीमती मिनाताई ठाकरे उदयानाच्या दिशेस कोपर रोड येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **तेजस बिल्डिंग, जुनी डोंबिवली** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने तेजस बिल्डिंग येथुन डावे वळण एन.एम.एम.टी. बस स्टॉप येथे उजवे वळण घेवुन कोपर रोडला डावे वळण घेवुन पुढे डोंबिवली पश्चिम येथुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**४)** जुनी डोंबिवली रोडने देवी चौकात जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **हॉटेल सेंट्रल पॅलेस, डोंबिवली पश्चिम** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने पं. दिनदयाळ रोड व स्वामी विवेकानंद विदयालय रोडने पुढे देवी चौक, डोंबिवली पश्चिम येथुन इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	कै. श्रीमती मिनाताई ठाकरे उदयानाच्या पश्चिमेचा रस्ता तेजस बिल्डिंग पर्यत शास्त्रीनगर हॉस्पीटल पाठीमागील रस्ता व एनएमएमटी बस स्टॉप येथील रस्ता हा २४ तास **" नो पार्किंग "** करण्यात येत आहे.

वर नमूद अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.